दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २०७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२२ ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# पनवेलमध्ये शुक्रवारी होणार मनोरंजन अनलॉक

## भाजपा सांस्कृतिक सेल तर्फे कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्जन्य रोगाचा प्रबंध व नियंत्रण उपाय म्हणून पनवेल महानगरपालिका क्षेत्र तसेच संपूर्ण राज्यात खबरदारीचा उपाय म्हणून नाट्यगृह संपूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते. परंतु नुकतेच काढलेल्या परिपत्रकामध्ये २२ ऑक्टोबर २०२१ पासून नाट्यगृह सुरु करण्यात यावे असे जाहीर केले आहे.

ह्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक सेल - उत्तर रायगड जिल्हा तर्फे आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर ह्यांच्या नेतृत्वाखाली मनोरंजन अनलॉक - २.० - संगीत, नृत्य व नाटकांची मेजवानी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ह्या कार्यक्रमामध्ये नृत्य आराधना कलानिकेतन ग्रुप, आदई आणि स्टार प्लस वरील डान्स प्लस ५ फेम पनवेलकर्स ग्रुप हे नृत्य सादर करणार आहेत. तसेच सामगंध ग्रुप,पनवेल हे सुरेल गाण्यांची मैफिल रंगवणार आहेत. त्यानंतर अटल



करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे विजेते 'कलांश थिएटर, रत्नागिरी तर्फे 'बारस' हे धमाल विनोदी नाटक सादर होणार आहे.

ह्या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून भाजपा सांस्कृतिक सेल चे प्रदेश अध्यक्ष, लातूर मनपा चे गटनेते शैलेश गोजमगुंडे हे उपस्थित राहणार आहेत.

तसेच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर व भाजप सांस्कृतिक सेल चे इतर काही प्रदेश व विभागीय प्रमुख पदाधिकारी व उत्तर रायगड आणि पनवेल भाजप चे पदाधिकारी देखील उपस्थित राहणार असल्याची माहिती उत्तर रायगड चे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन ह्यांनी दिली.

सदर कार्यक्रम हा पनवेलच्या आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी (दि.२२ ऑक्टोबर) सायं ६.३० वाजता आयोजित केला असून ह्या कार्यक्रमासाठी प्रवेश हा मोफत असून प्रवेशिका सोबत असणं अनिवार्य आहे.

## संक्षिप्त...

### आर्यन खानच्या न्यायालयीन कोठडीत ३० ऑक्टोबरपर्यंत वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील क्रूझ ड्रग्ज पार्टी प्रकरणात अटकेत असलेल्या आर्यन खानला मुंबईच्या विशेष एनडीपीएस कोर्टानं आणखी एक धक्का दिला आहे. आर्यन खान याच्यासह अटकेत असलेल्या इतरांच्या न्यायालयीन कोठडीत आता ३० ऑक्टोबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. आर्यन खानच्या जामीनासाठी गेल्या १६ दिवसांत ४ वेळा जामीन याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. पण त्यात कोणतंही यश आर्यन खानच्या वकिलांना आलेलं दिसत नाही. आज तर कोर्टानं न्यायालयीन कोठडीत आणखी वाढ करुन पुन्हा एकदा जोरदार धक्का दिला आहे.

विशेष एनडीपीएस कोर्टानं आर्यन खान याला जामीन नाकारल्यानंतर वकिलांनी जामीनासाठी मुंबई हायकोर्टाचा दरवाजा ठोठावला होता. पण आज मुंबई हायकोर्टात त्यावर सु-नावणी होऊ शकली नाही. एनसीबीच्या मागणीनुसार मुंबई हायकोर्टात आता मंगळवारी आर्यन खानच्या जामीन याचिकेवर सुनावणी होणार आहे. त्यामुळे सध्या तरी आर्यन खानला मुंबईच्या आर्थर रोड तुरुंगातच राहावं लागणार आहे. आर्यनच्या सुटकेसाठी आता वकील मुंबई हायकोर्टात जोरदार प्रयत्न करत आहेत. हायकोर्टाच्या सुनावणीकडे आता सर्वांचं लक्ष असणार आहे.

मुंबई हायकोर्टातील सुनावणीवेळी आर्यन खानचे वकील सतीश मानेशिंदे यांनी जामीन याचिकेवर शुक्रवारी सुना-वणीची मागणी केली. पण एनसीबीच्या वकिलांकडून कोणतीही प्रत आम्हाला प्राप्त झालेली नसून संपूर्ण तयारीसाठी आणखी काही दिवसांची गरज असल्याचं म्हटलं. हायकोर्टानं एनसीबीची मागणी मान्य करत मंगळवारी आर्यन खानच्या जामीन याचिकेवरील सुनावणीला सुरुवात होणार आहे.

# रोहा-माणगाव स्थानकांवर अनेक एक्सप्रेसना लवकरच लाल झेंडा दिसणार

## खा.सुनील तटकरे यांची मध्य रेल्वेकडे आग्रही मागणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रेल्वेसंदर्भातील विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी आज रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनिल तटकरे यांनी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अनिल कुमार लाहोटी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी दिवा-रोहा (चएचण) ट्रेन पुन्हा सुरू करण्याची तसेच रोहा स्थानकावर रोहा-पनवेल, रोहा-दिवा पॅसेंजर यासह नेत्रावती एक्सप्रेस, मंगला एक्सप्रेस, मत्स्यगंधा तसेच मांडवी एक्सप्रेसला व माणगाव स्थानकांवर ओखा एक्सप्रेस, बिकानेर एक्सप्रेस व मरुसागर एक्सप्रेसला थांबा देण्याची मागणी प्रामुख्याने केली.

याबद्दल मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी अनुकूलता दर्शविली असून रोहा-अष्टमी तसेच निडी खारपडी येथील दोन्ही पूलांच्या कामासाठी तात्काळ निधी देण्याचेही निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीस उपमहाव्यवस्थापक चंद्रशेखर, मुंबईचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक शरद गोयल, महाव्यवस्थापकांचे सचिव साकेत मिश्रा उपस्थित होते.



# सासु-सुनेला रेल्वेची धडक ; दोघींचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यात सर्वानाच सुन्न करणारी घटना घडली असून बुधवारी रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान नवघर येथील एका घरात सून आणि सासू चे जेवणावरून किरकोळ वाद झाला आणि हा वाद विकोपाला गेल्याने सुनेने थेट जीव देण्याचे पाऊल उचलल्याने खोपोली बाजूकडून कर्जत कडे जाणाऱ्या भरधाव वेगात येणारे रेल्वे खाली उडी मारल्याने तिला वाचविण्यासाठी तिच्या पाठीमागे असणाऱ्या सासूने तिला वाचविण्यासाठी बाजूला ओढत असताना या दोघींना जबर मार लागल्याने त्यांना खोपोली रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान या दोघींचा ही दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आल्याने साऱ्यांच्या काळजाचे ठोकेच चुकले. या दोघींवर गुरुवारी सकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करन्यात आले.

याबाबत मिळालेली माहिती अशी की खालापूर तालुक्यात नवघर येथील प्रतीक्षा राकेश देशमुख वय २६ सून व तिची सासू नलिनी हरीचंद्र देशमुख वय ५५ या दोघींमध्ये घरगुती कारणावरून किरकोळ वाद अधून मधून सुरू होते. मात्र हे वाद एवढे विकोपाला जातील असे कुणालाही वाटले नव्हते. रात्री जेवण करण्यासाठी सर्व बसले असताना जेवणावरून सून प्रतीक्षा व सासू नलिनी यांच्या भांडण झाले हा वाद वाढतच गेल्याने सून प्रतीक्षा ही जीव देण्याची भाषा करून थेट रेल्वे मार्ग गाठण्याचा निर्णय घतल्याने घरातून बाहेर पडत रेल्वेच्या दिशेने गेल्याचे सासू नलिनी यांना समजतात त्या तिच्या पाठीमागून जाऊन थांबण्यासाठी हाका मारत असताना खोपोली बाजूकडून भरधाव वेगात कर्जतकडे जाणारी रेल्वे आल्याने थेट रेल्वेच्या दिशेने प्रतिक्षाने उडी घेतल्याचे पाहून सासू नलिनी यांनी तिला वाचविण्यासाठी गेली असता रेल्वेचा दोघींना ही जोरदार फटका बसल्याने जबर मार लागला. त्यांना तात्काळ खोपोली येथील रुग्णालयात घेऊन गेले असता सासू नलिनी देशमुख यांचा खोपोली नगरपालिका रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला तर सून प्रतीक्षा हिचा पार्वती हॉस्पिटल रुग्णालयात या खाजगी रुग्णालयाय मृत्यू झाला. या घटनेची बातमी सर्वत्र वाऱ्या सारखी पसरल्याने सर्वांच्याच काळजाचा ठोका चुकला. शोकाकुल वातावरणात सासू सुने वर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अखेर उरण ते करंजा एसटी सेवा सुरु

**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोना संसर्गजन्य विषाणूच्या थैमानामुळे राज्यात बहुतांशी ठिकाणच्या एसटी परिवहन सेवा बंद करण्यात आल्या होत्या.मात्र आत्ता कोरोना संसर्ग संपुष्टात आल्याने ठिकठिकाणच्या एसटी सेवा सुरु करण्यात आल्या असून, उरण तालुक्यातील करंजा येथील द्रोणागिरी हायस्कूल विद्यार्थ्यांकरिता उरण एसटी डेपोतुन सकाळी १० वाजता करंजा करिता बस सेवेचे उदघाटन करण्यात आले.

या प्रसंगी उरण आगाराचे व्यवस्थापक उदय जुवेकर, सहाय्यक वाहतूक निरीक्षक नरेंद्र भुंडे, विद्यालयाचे चेअरमन सिताराम नाखवा, व्हा.चेअरमन के.एल. कोळी, मुख्याध्यापक ए. टी. पाटील, पालक, विद्यार्थी व शिक्षक वर्ग उपस्थित होता. सदर सेवेचा लाभ चारफाटा, डाऊर नगर, मुळेखंड, गणेश



नगर,चाणजे येथील विद्यार्थ्यांना होणार आहे.

सदर वेळी चेअरमन सिताराम नाखवा यांनी डेपो व्यवस्थापक उदय जुईकर विनंती केली की एसटीची सेवा करंजा नाक्यापर्यंत झाल्यास येथील ग्रामस्थ व प्रवासी यांना सुद्धाचा या सेवेचा लाभ घेता येईल. एसटी फिरण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने शक्य नाही. मात्र एसटी फिरण्यासाठी जागा उपलब्ध झाल्यास एसटी सेवा करंजा धक्या पर्यंत सुरु करता येईल. सध्या तरी कस्टम चाळी पर्यंत एसटी सुरु राहील.

# पोलीस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलिसांना पुष्पचक्र अर्पण करून सलामी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पोलीस हुतात्मा दिनानिमित्त आज रायगड पोलीस मुख्यालय कवायत मैदान येथे पोलीस स्मृतीदिन कार्यक्रम संपन्न झाला. पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर पोलीस शहीद स्मारकास रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिता पारधी आणि जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलीस शहीद जवानांना पुष्पचक्र अर्पण करून सलामी देण्यात आली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, पोलीस उपअधीक्षक (गृह)जगदीश काकडे, अलिबाग उप विभागीय पोलीस अधिकारी सोनाली कदम, रोहा उप विभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी व इतर पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



या स्मृतीदिनानिमित्त सन २०२०-२०२१ मध्ये वीरगती प्राप्त झालेल्या ३७७ शहीद पोलिसांना आदरांजली म्हणून पोलीस हुतात्मा स्मारकास मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी उप विभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी आणि सोनाली कदम यांनी वीरगती प्राप्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नावांचे वाचन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस हवा-लदार दिनेश बिर्जे यांनी केले. यावेळी १८ पोलीस अधिकारी व १०९ पोलीस अंमलदार हजर होते. हुतात्मा परेड करिता परेड कमांडर राखीव पोलीस निरीक्षक मुख्यालय दशरथ हाटकर तसेच ४५ एकूण पोलीस जवान, पोलीस बॅड पथक यांनी मानवंदना दिली.

# युवा मोर्चाच्या वतीने किल्ले स्पर्धेचे आयोजन

## आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पोस्टरचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता

> युवा मोर्चाच्यावतीने दरवर्षी किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात येते. आणि त्या माध्यमातून आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि किल्ले यांचा इतिहास तरुण पिढीला विशेषतः लहान मुलांना अवगत केले जात आहे. दिवाळीच्या सुट्टीत अभ्यासाला सुट्टी असते मात्र अशा स्पर्धेच्या माध्यमातून इतिहास आणि संस्कृती जपण्याचे काम होत असते. या आयोजनाबद्दल युवा मोर्चाचे अभिनंदन.
>
> **- आमदार प्रशांत ठाकूर**



युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने दीप-ावली निमित्त ' भव्य किल्ले स्पर्धा २०२१' चे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या स्पर्धेचे तिसरे वर्ष असून स्पर्धेच्या पोस्टरचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आज (दि. २१) शहरातील छत्रपती शिवाजी महाराज अश्वरूढ पुतळा येथे महाराजांना अभिवादन करून करण्यात आले.

यावेळी भाजपचे शहराध्यक्ष जयंत पगडे, पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, ज्येष्ठ कार्यकर्ते

...‍/२

# पोलीस ठाण्यांच्या इमारतींसाठी आवश्यक निधी देऊ : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जनतेच्या रक्षणाची जबाबदारी पोलिसांवर आहे. पोलिस आपले कर्तव्य चोखपणे बजावित असल्यामुळे आपण सुरक्षित वातावरणात राहतो. त्यामुळे पोलिसाप्रती कृतज्ञता म्हणून राज्य शासन हिताचे विविध निर्णय घेत आहे. पोलिसांच्या मानसिक आणि आर्थिक स्थैर्यासाठी संपूर्ण सहकार्य करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते अचलपूर आणि सरमसपुरा येथील पोलिस ठाण्याच्या नवीन प्रशासकीय इमारती आणि पोलिस वसाहत, चांदूरबाजार पोलिस ठाणे, शिरजगाव कसबा, पथ्रोट येथील नवीन पोलिस इमारती आणि पोलिस ठाणे, आसेगाव येथील पोलिस वसाहतींचा उद्घाटन आणि लोकार्पण, तसेच अचलपूर तालुक्यातील



महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८३ गावे प्रादेशिक ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे ई-भूमिपूजन दूरस्थ पद्धतीने करण्यात आले.

यावेळी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई, पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री संजय बनसोडे, खासदार नवनीत राणा, आमदार राजकुमार पटेल दुरस्थ पद्धतीने उपस्थित होते, तर अचलपूर येथील कार्यक्रमाला जलसंपदा राज्यमंत्री बच्चू कडू, नगराध्यक्षा सुनिता फिस्के, विशेष पोलिस महानिरिक्षक चंद्रकिशोर मिना, पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, पोलिस गृहनिर्माणचे अधिक्षक अभियंता

...‍/२

# निर्णयात दिरंगाई नको

आपल्या शिक्षण पद्धतीत दहावी आणि बारावीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पुढील भविष्याची दिशा यावेळी ठरत असते. करोनामुळे शिक्षणाचा आधीच खेळखंडोबा झाल्याने, केंद्रीय शिक्षण मंडळे परीक्षांबाबत तातडीने काही निर्णय घेत आहेत. राज्याचा शिक्षण विभाग मात्र अजून जागा झालेला नाही. आधीच राज्याच्या मंडळाकडे पाठ फिरवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना, ही ढिलाई आत्मघातक ठरणारी आहे. विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्याच्या उद्देशाने केंद्रीय शिक्षण माध्यमिक मंडळाने दोन्ही सत्रांच्या परीक्षा बोर्डाच्या माध्यमातून घेण्याचा निर्णय घेतला आहे. दुसऱ्या सत्राची परीक्षा होऊ शकली नाही, तर निकाल जाहीर करताना निकष ठरविणे त्यामुळे सुलभ होऊ शकेल. इतर राज्यांतील शिक्षण मंडळांनीही याबाबत भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. काहींनी शाळांना अंतर्गत मूल्यमापन अधिक काटेकोर करण्याचे निर्देश दिले आहेत. काहींनी केवळ वार्षिक परीक्षाच नव्हे, तर सत्र परीक्षाही मंडळाच्या माध्यमातून घेण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्राचा शिक्षण विभाग मात्र थंडच आहे; त्यामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यात संभ्रम आहे. राज्याचा शालेय शिक्षण विभागात अनेकदा निर्णयात दिरंगाई आणि गोंधळ दिसतो. यामुळे आयत्यावेळी संभ्रमाचे वातावरण निर्माण होते. शालेय शिक्षण विभागाने चार ऑक्टोबरला 'माझे विद्यार्थी माझी जबाबदारी' या परिपत्रकात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या सूचना दिल्या. त्या नवीन नाहीत. शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यापासून असेच मूल्यमापन अपेक्षित आहे. ते कोणत्या शाळांमध्ये किती नियमित होते, याची तपासणी होते का? आता प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्या आहेत. लसीकरणाने वेग पकडला आहे. तिसऱ्या लाटेची भीती कमी होत आहे. या सर्व सकारात्मक खुणा असल्या, तरी परिस्थिती अजून पूर्णपणे आपल्या हातात नाही. तोंडावरचे मास्क जोवर जात नाहीत; तोवर आपण करोनामुक्त झालो, असे म्हणता येणार नाही. येत्या मार्च महिन्यात मंडळाच्या परीक्षा पूर्वीप्रमाणे ऑफलाइन म्हणजे प्रत्यक्ष होतील, असे आपण गृहित धरले, तरी अनेक भागांत प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्यानंतरच विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू झाले आहे. यामुळे विद्यार्थ्यांवर येणाऱ्या मानसिक आणि शैक्षणिक ताणाचा विचार होणेही आवश्यक आहे. शाळा सुरू झाल्या, तरी निर्बंध कायम आहेत. परीक्षांच्या काळातही हे निर्बंध असतील. या सगळ्याचा विचार करून यंदा इतर मंडळांप्रमाणे अंतर्गत मूल्यमापनावर विशेष भर देऊन, लेखी परीक्षा ५० टक्के गुणांची घेतल्यास निकाल लावण्यापासून अनेक प्रक्रिया सुलभ होतील. अन्यथा यंदाही आपल्या विद्यार्थ्यांना इतर मंडळांच्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करणे अवघड होणार आहे. सर्व राज्यांचे शिक्षणमंत्री सभासद असलेल्या 'शालेय शिक्षण मंडळ परिषदे'ची भूमिका यात महत्त्वाची ठरणार आहे. राज्यातील सर्व शिक्षण मंडळांमध्ये समानता असावी, या उद्देशाने या परिषदेची स्थापना झाली. गेल्या काही वर्षांपासून ही परिषद थंड पडल्यामुळे प्रत्येक शिक्षण मंडळ आपल्या सोयीने निर्णय घेते आणि बहुतेकदा केंद्रीय शिक्षण मंडळाच्या निर्णयाप्रमाणे इतर मंडळांना आपली दिशा ठरवावी किंवा बदलावी लागते. सध्याच्या परिस्थितीत ही परिषद पुन्हा कार्यरत झाली आणि चर्चा करून योग्य निर्णय घेतला गेल्यास राज्यातीलच नव्हे, तर देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला समान न्याय व समान संधी देता येईल. अन्यथा काही विशिष्ट शिक्षण मंडळांत गुणफुगवटा दिसेल, तर काही मुलांना कठोर तपासणीचा गुणफटका बसेल. याचा परिणाम अकरावीच्या प्रवेशात होतो. सध्या प्रत्येक शाळा आपल्या स्तरावर प्रथम सत्र परीक्षेची तयारी करीत आहेत. यातच इयत्ता नववी ते बारावी यासाठी प्रथम सत्र परीक्षेच्या प्रश्नपत्रिका आणि त्यातील प्रश्नांचे स्वरूप हे प्रचलित पद्धतीने असावे की बहुपर्यायी प्रश्न अधिक असावेत, या विषयी शिक्षक द्विधा मनस्थितीत आहेत. राज्यातील सर्व शाळांमध्ये होणाऱ्या सत्र, घटक चाचण्या, अंतर्गत मूल्यमान अशा परीक्षांचा दर्जा किंवा काठिण्य पातळी एक समान असणेच योग्य राहील. याबाबत चर्चा करून लवकर अंतिम निर्णय जाहीर करणे आवश्यक आहे. दिवाळीच्या सुटीनंतर विद्यार्थ्यांना तयारीसाठी तीन महिनेच मिळणार आहेत. गेल्यावर्षी दुधाने तोंड पोळले आहे; त्यामुळे यंदा गुणदानात विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन व्हावे अशी अपेक्षा असेल, तर परीक्षेच्या स्वरूपाविषयी चर्चा आणि निर्णय आत्ताच होणे उचित आहे. अन्यथा त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसेल. शालेय शिक्षण विभागाने शिक्षक, विद्यार्थी, पालक यांना योग्य ती दिशा आताच दिल्यास विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन होऊ शकेल. लाखो विद्यार्थ्यांच्या या व्यथेकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही.

# शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांचा स्मृतीदिन साजरा

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

रायगड जिल्हा परिषदेचे पहिले जिल्हा अध्यक्ष होण्याचा बहुमान पटकावणारे व दलित, आदिवासी पददलित यांना मोफत शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचवणारे शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांचा ११ वा स्मृतिदिन सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाळांमधून साजरा करण्यात आला. यावेळी दादासाहेब लिमये यांनी केलेल्या सामाजिक शैक्षणिक कार्याचा उल्लेख करून स्मृतींना उजाळा देण्यात आला.

केशव गोविंद लिमये उर्फ शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांनी आपल्या कार्यातून समाज घडविण्याचे मोठे कार्य केले आहे. रायगड जिल्हा परिषदेचे ते पहिले जिल्हाध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी ग्रामीण भागात जिल्हा परिषदांच्या शाळांचे जाळे विणले होते. त्यानंतर सुधागड एज्युकेशन सोसायटीची स्थापना केल्यानंतर रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यात संस्थेच्या शाळा त्यांनी उघडून तळागाळातील शेतकरी व दलित आदिवासी बांधवांना मोफत शिक्षण देण्यासाठी त्यांनी विशेष पुढाकार घेतला होता.

सुधागड तालुक्यातील कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळाच्या वतीने दलित व पददलित तसेच बेवारस असणाऱ्या मुला-मुलींना मोफत शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनण्यासाठी त्यांचा विशेष पुढाकार होता.

२१ ऑक्टोंबर हा त्यांचा स्मृतिदिन असून सुधागड एज्युकेशन संस्थेच्या विविध शाळांतून आज दादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलात मराठी प्राथमिक, हिंदी प्राथमिक, इंग्रजी माध्यमिक व विविध शाखांतून दादांचा स्मृतिदिन साजरा करून त्यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला.

# खाकी वर्दीतील देवमाणूस म्हणून पोलीस उपनिरीक्षक मनिष बच्छाव यांचे केले नगरसेवक रवींद्र भगत यांनी कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खाकी वर्दीतील देव माणूस म्हणून कळंबोली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मनिष बच्छाव यांचे त्यांनी कोरोना काळात केलेल्या मदतीच्या पार्श्वभूमीवर विशेष कौतुक नगरसेवक रवींद्र भगत यांनी केले आहे.

पोलीस उपनिरीक्षक मनिष बच्छाव हे कोरोनाच्या पहिल्या दिवसा पासुन नागरिकांना आव्हान करण्याचे आणि सजस्याने समजावून सांगत असत. एकदा ते कळंबोली डी मार्ट जवळ बंदोबस्तात होते. घरातुन एक व्यक्ती सुद्धा बाहेर पडत नव्हती अशातच एक बाई आपल्या ८ महिन्याच्या मुलाला घेऊन जात असताना त्यांनी तिला थांबवले ये बाई एवढ्या उन्हाची कुठे चाललीस असे विचारले असता तिने सांगितले की, २ दिवस झाले खायला अन्न नाही मुलाला दुध नाही एक तरी दुकानातून मला सामान आणू द्या असे बोलल्याने तीचे ते बोलणे ऐकून तात्काळ मनिष बच्छाव यांनी त्यांच्या गाडीत असलेले धान्याचे किट काढून तिला दिले. त्यावेळी तीचा पती धावत आला. त्याला वाटले की पोलीस आपल्या पत्नीला मारत आहेत. परंतु पोलिसांमधील मायेचा ओलावा बघून त्या दोघा पती-पत्नींच्या डोळ्यातून अश्रू उभे राहिले हा अनुभव स्थानिक नगरसेवक रवींद्र भगत यांनी स्वतः बघितला होता. आज मनिष बच्छाव यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देताना त्यांनी एवढेच सांगितले की, कळंबोली वासियांनी एक खाकीमधील देव माणूस पाहिला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## युवा मोर्चाच्या वतीने किल्ले स्पर्धेचे आयोजन

शांताराम महाडिक, युवा नेते संजय जैन, गौरव कांडपिळे, चिन्मय समेळ, केदार भगत, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष रोहित जगताप, विवेक होन, शावेज रिझवी, आत्मनिर्भर भारतचे रायगड जिल्हाध्यक्ष आकाश भाटी, नूतन पाटील, यांच्यासह युवा मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

दरवर्षीप्रमाणे यंदाही युवा मोर्चाच्यावतीने भव्य किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ०७ हजार रुपये तर द्वितीय व तृतीय अनुक्रमे ०५ हजार व ०३ हजार रुपये असून एकूण ३० हजार रुपयांची २० उत्तेजनार्थ पारितोषिके असणार आहेत. एकूण विजेत्यांना ४५ हजार रुपयांची पारितोषिके व आकर्षक चषक ने सन्मानित करण्यात येणार असून सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभाग घेण्याकरिता नावनोंदणीची अंतिम तारीख ०२ नोव्हेंबर आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी रोहित जगताप (८६९१९३०७०९), अजिंक्य भिडे (८८५०६४४२०७), देवांशू प्रभाळे (८४३३५१३५४०), किंवा अनिकेत भोईर (९९३०१०४४९९) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पोलीस ठाण्यांच्या इमारतींसाठी आवश्यक निधी देऊ : मुख्यमंत्री

धनंजय चामलवार आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले, पोलीस ठाणे आणि निवासाच्या इमारती पूर्ण करण्याबरोबरच वर्षानुवर्षे एकाच पदावर काम करणाऱ्या पोलिसांना पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवृत्त होण्याच्या मार्ग मोकळा करण्यात आला आहे. पोलिसांना सुखसुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच जनताभिमुख करण्यावर भर देण्यात येणार आहे. कोरोनाकाळात पोलिसांनी अभूतपूर्व असे कार्य केले. पोलिसांसाठी निधीची कमतरता पडू देण्यात येणार नाही. परतवाडा येथील पोलिस ठाण्यासाठी निधी देण्यात येईल.

संपूर्ण देशात निसर्गाच्या लहरीपणामुळे पावसाचा असमतोल होत आहे. त्यामुळे शेतकरीवर्ग अडचणीत आला आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांना विविध योजनांच्या माध्यमातून मदत करण्यात येत आहे. शेतकरी बांधवांनी कोरोनाच्या कठीण काळात साथ दिली, हीच साथ यापुढेही द्यावी.

पेयजल उपलब्धतेसाठी संपूर्ण राज्यात जलजीवन मिशनच्या माध्यमातून पाणी पुरवठ्याची सोय करण्यात येत आहे. प्रामुख्याने विदर्भातील खारपाण पट्ट्यात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी योजना राबविण्यात येत आहे. या संपूर्ण योजनांना निधी उपलब्ध करून देऊन योजना तातडीने पूर्ण करण्यात येतील.

जनतेने मला भेटण्याची इच्छा व्यक्त केली आहे, त्यांच्या विनंतीला मान देऊन लवकरच अमरावती जिल्ह्याचा दौरा करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पाणीपुरवठा मंत्री श्री.गुलाबराव पाटील म्हणाले, पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर प्रति माणसी ५५ लिटर पाणी उपलब्ध होईल. अचलपूर येथील पाणीपुरवठा योजनेला सपन धरणावरून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. पाण्याचा उद्भव चांगला असल्याने या योजना यशस्वी ठरतील. जलजीवन मिशनच्या माध्यमातून राज्यातील २७ हजार गावातील प्रत्येक घराला पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था यंत्रणेच्या कामाचा व्याप जादा असल्याने अतिरिक पोलिस अधिक्षक देण्याची मागणी राज्यमंत्री श्री. कडू यांनी केली. आठपैकी सहा पोलिस ठाणे इमारती पूर्ण झाली असून उर्वरित दोन ठाण्यांसाठी निधी देण्याचीही मागणी त्यांनी केली. प्रबोधनकार विकास आराखड्यातून २५ कोटी दिल्यास शहराचा विकास होण्यास मदत मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष पोलिस महानिरिक्षक चंद्रकिशोर मिना यांनी आभार मानले.

# म्हसळयातील भूमी अभिलेख कार्यालयात ११ पदे रिक्त

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा भूमी अभिलेख कार्यालयात विविध पदांची संख्या १८ आहे त्यापैकी केवळ ७ पदे भरली असून तब्बल ११ पदे रिक्त आसल्याची माहीती पुढे येत आहे.नव्याने अधिक्षक भूमी अभीलेख या रिक्त जागी आलेले वाय.जी.कातडे ह्यांच्या कडे अतीरीक्त कार्यभार तळ्याचा असल्याने त्यांना खरी कसरत करावी लागते.

कातडे हे अनुभवी असल्याने तालुक्यातील लॉकडाऊन मुळे गेली दोन वर्षे रखडलेली कामे त्यांच्या कुशल नेतृत्वाने पूर्णत्वाकडे नेण्याचे काम त्यांचे कार्यालईन सहकारी करीत आहेत. भूमीअभिलेख कार्यालयातील रिक्त पदे पुढील प्रमाणे निमतानदार २, छाननी लिपिक १, दुरुस्ती लिपीक १, कनिष्ठ लिपीक१, भूकर मापक १, न.भू.लिपीक १, प्रति लिपिक १, दप्तर वबंद १, शिपाई ३ अशी तब्बल ११ पदे रिक्त आ-हेत. अपुऱ्या कार्यलयीन कर्मचा ऱ्यांमुळे म्हसळा शहर व तालुक्यातील नागरिकांची शेतजमीन, प्लॉट मोजणीची कामे काही काळ खोलंबळी असल्याने नागरिकांना त्रास होत आहे. तसेच ग्रामीण उतारे, चतु:सीमा, फेरफार प्रकरणे, उतारे देणे, वारस लावणे, प्रॉपर्टी कार्ड काढणे आदी कामांसाठी नागरिकाना वारंवार चकरा माराव्या लागत असल्याने आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.तालुक्यातील आंबेत खाडीपट्टा भागातील नागरिकाना येण्या जाण्याच्या सुविधा पुरेशा नसल्याने आणि ते अधिक खर्चिक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी व भूमी अभिलेख विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत तात्काळ दखल घेऊन या कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी जनतेकडून होत आहे.

# कुणबी समाज विद्यालय म्हसाडी येथे विद्यार्थ्यांना गणवेश वाटप





**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील महाराष्ट्र कुणबी समाज सूधारणा संघ मुंबई. संचालीत कुणबी समाज म्हसाडी येथे वाली येथील दानशूर सामाजिक कार्यकर्ते विशाल लाड, बारशेत येथील विजय पवार यांच्या हस्ते आदिवासी गरीब गरजू विद्यार्थांना मोफत गणवेष वाटप २१आँक्टो रोजी करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष नारायण पवार, महाराष्ट्र कुणबी सुधारणा संघ मुंबई अध्यक्ष माधवजी आग्री, मुख्याध्यापक भांडवलकर सर,पत्रकार नझीर पठाण, हमीद म्हैसकर शिक्षक कर्मचारी वृंद उपस्थित होते. विशाल लाड, विजय पवार याची सामाजिक बांधिलकीची नाळ या गावाशी गेली जोडली असून शैक्षणीक साहित्य वाटपासह अन्य गरजूंना जीवनावश्यक साहित्य वाटप करीत असतात.

कुणबीसमाज हायस्कूल म्हसाडीतालुक्यातील एकमेव डोंगराळ व दुर्गम ग्रामीण भागात स्थापन झाले असून या भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळतआहे. त्यामुळे विद्यार्थी संख्येचा वाढता आलेख कायम आहे. सद्यस्थितीत विद्यार्थी संख्या ८५ असून आदिवासी समाजातील जवळपास ५०% विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. त्यामुळे या पंचक्रोशीतील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहात नाहीत. संपूर्ण शिक्षण मोफत असून कोणतीही फि आकारली जात नसून फक्त परीक्षा शुल्क घेतले जाते. असे प्रास्ताविकात सह शिक्षक म्हात्रे यांनी सांगितले.


प्रो.जमा. २-२५

अर्जदाराचे वकील
ॲड.श्रृती द. शिंदे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१४५१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१२/२०२१

कै.हरेंद्र कुमार हरिश्चंद्र ठाकूर
१) श्रीमती.निलम हरेंद्र कुमार ठाकूर
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.रिद्धी हरेंद्र कुमार ठाकूर
वय : २४ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.सिद्धी हरेंद्र कुमार ठाकूर
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
४) कु.कन्हैया कुमार हरेंद्र कुमार ठाकूर
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.सत्यकेतू कॉम्प्लेक्स, आपना बाजार समोर,
प्लॉट नं.९, सेक्टर ३५, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी कै.हरेंद्र कुमार हरिश्चंद्र ठाकूर हे दि.२४/०४/२०२१ रोजी मौजे : इंद्रावती हॉस्पिटल, ऐरोली, नवी मुंबई, जि.ठाणे येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सत्यकेतू कॉम्प्लेक्स, आपना बाजार समोर, प्लॉट नं.९, सेक्टर ३५, शॉप नं.४३ आणि ४४, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ३७.६३ चौरस फूट कारपेट**

कै.हरेंद्र कुमार हरिश्चंद्र ठाकूर यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल १) श्री.अनंत लक्ष्मण पाटील, २) श्री.तेजस अनंत पाटील, ३) श्री.नंदकुमार अंबाजी पाटील, ४) श्री.विलास अंबाजी पाटील सर्व रा.वाघिवली वाडा, ता.पनवेल, जि.रायगड यांची ग्रामपंचायत ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हद्दीतील वाघिवली वाडा गावात असलेली घर मिळकत नवी मुंबई प्रकल्पांतर्गत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामांसाठी संपादीत झाल्यामुळे सदर संपादनाचे मोबदल्यात पुनर्वसन व पुनःस्थापनेंतर्गत खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिलांना सिडकोने वाटपीत केलेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

**नोड : पुष्पक (वडघर), ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| ६७ | आर-५ | ६२० |

येणेप्रमाणे भूखंडाचे वर्णन असून ज्याचा उल्लेख यात यापुढे सदरहू भूखंड असा केला आहे.

सदरहू भूखंड विकसित करण्याचा करारनामा माझे अशिल आणि मे.अथर्व डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री.मयुर गंगाधर शेटे, २) श्री.विनायक दगडू पाटील यांच्यात झालेला आहे. परंतु, सदर कराराप्रमाणे मे.अथर्व डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री.मयुर गंगाधर शेटे, २) श्री.विनायक दगडू पाटील यांनी वागणूक न करता कराराचे भंग केले असल्यामुळे माझे अशिलांनी त्यांना विनिर्दिष्ट दिलासा अधिनियम, १९६३ चे कलम २० च्या तरतुदीनुसार कराराच्या पर्यायी पालनाची कार्यवाही संबंधी दि.१२/०७/२०२१ रोजीची कायदेशीर नोटीस दिली होती. त्या नोटीशीतील मागणीनुसार विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित कार्यवाही करण्यास त्यांनी कसूर केलेली आहे.

तरी माझे अशिल कायद्यानुसार सदर कराराचे पर्यायी पालन स्वतः अथवा अन्य त्रयस्थ व्यक्तींमार्फत करून घेतील याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक: २२/१०/२०२१

**सही/-**
**ॲड.राहूल दत्तात्रेय मोकल**
**मु.पो.पारगाव, ता.पनवेल,**
**जि.रायगड-४१०२०६**


# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील महामानव या महाकाव्यग्रंथाचे प्रकाशन संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील महामानव या महाकाव्य ग्रंथाचे प्रकाशन काल (दि.२० ऑक्टोबर) रोजी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांच्या दालनात संपन्न झाले.

यानिमित्ताने अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी या महाकाव्य ग्रंथासाठी योगदान दिलेल्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, प्रा.श्रध्दा शेट्ये, कवी मारुती सपकाळ, ज्येष्ठ पत्रकार जयपाल पाटील, जेष्ठ पत्रकार सुभाष म्हात्रे, महेंद्रकुमार गायकवाड, कवी मधुकर जाधव, उद्योजक कुणाल भोईर, सुजित नांदगावकर हे उपस्थित होते. सुप्रसिद्ध लेखक श्री.प्रवीण दवणे यांचे बंधू नांदेड चे रहिवासी प्रा.अशोककुमार दवणे यांनी हे महाकाव्य रचण्याचे शिवधनुष्य पेलले आहे. या महाकाव्य ग्रंथात २०२१ या वर्षाचे निमित्त साधून एकूण २०२१ महाराष्ट्र मधील कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर रचलेल्या २०२१ कवितांचा समावेश आहे.


मा.मुजावर सो.

अर्जदारातर्फे वकील
विवेक सदाशिव तावडे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३८३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/१२/२०२१

१) कोमल सुनील धायगुडे
गाव : विठ्ठल वाडी, (घोरपडी) तालुका : कवठेमहाकाळ
जिल्हा : सांगली, महाराष्ट्र-४१६४०३
२) अद्वैत सुनील धायगुडे
गाव : विठ्ठल वाडी, (घोरपडी) तालुका : कवठेमहाकाळ
जिल्हा : सांगली, महाराष्ट्र-४१६४०३
३) शिरमाबाई जगन्नाथ धायगुडे
गाव : विठ्ठल वाडी, (घोरपडी) तालुका : कवठेमहाकाळ
जिल्हा : सांगली, महाराष्ट्र-४१६४०३ — अर्जदार
विरुद्ध
१) दत्तात्रय जगन्नाथ धायगुडे
बी.जी.टेलर्स, खारदेव नगर, गोवंडी रोड, एन.जी.
आचार्य मार्ग, चेंबूर मुंबई, मुंबई-४०००७१ — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै. सुनील जगन्नाथ धायगुडे यांचे निधन दि.०९/०८/२०२० रोजी पनवेल येथे झाले असून अर्जदार १) कोमल सुनील धायगुडे, २) अद्वैत सुनील धायगुडे, ३) शिरमाबाई जगन्नाथ धायगुडे रा. विठ्ठल वाडी, (घोरपडी) तालुका : कवठेमहाकाळ, जिल्हा : सांगली, महाराष्ट्र-४१६४०३ यांनी कै.सुनील जगन्नाथ धायगुडे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील सदनिका नंबर ४०१ (मधील ५०% अविभक्त हिस्सा), चौथा मजला, तुळशी आंगण, प्लॉट-१५, सेक्टर ६, करंजाडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६. क्षेत्र : ४१.९१, चौरस मीटर बिल्टअप, अशा वर्णनाची मिळकत**

कै.सुनील जगन्नाथ धायगुडे यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारसा दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## महिला बचत गटातर्फे दिवाळीनिमित्त प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबईतील महिला उद्योजिका तसेच महिला बचत गट यांच्यातर्फे दिवाळीनिमित्त पनवेलमध्ये भव्य प्रदर्शन आणि विक्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

पनवेलच्या के.गो.लिमये वाचनालय येथे २२, २३ ,२४ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत या भव्य प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन सुप्रसिद्ध लावणी सम्राज्ञी माया जाधव तसेच चित्रपट व नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी यांच्या हस्ते होणार आहे. या महोत्सवात ज्वेलरी,अगरबत्ती, कपडे,फरसाण, मिठाई व पर्सेस, हर्बल प्रोडक्ट, आयुर्वेदिक तेल,दिवे, मसाले,सुगंधी उटणे,बेडशीट आदी वस्तूंची विक्री प्रदर्शनात होणार आहे. या महोत्सवाचे आयोजन सुनिता खिल्लारे व संगीता थोरात यांनी केले आहे.

## शिवसेनेने करून घेतली वाड्यांमध्ये औषध फवारणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील टेंभोडे, वळवली, सागवाडी, वाघाचीवाडी या गावामध्ये शिवसेनेच्या प्रयत्नाने औषध फवारणी करून घेण्यात आली आहे.



जिल्हाप्रमुख शिरीष घरत व महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली आणि विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर व शहर प्रमुख डी.एन.मिश्रा आदींनी कळंबोली, प्रभाग क्र. ९ येथील ग्रामीण भाग टेंम्बोडे, वळवली, सागवाडी, वाघाचीवाडी या गावांमध्ये मलेरिया आणि इतर साथीच्या रोगांवरील औषध फवारणी करून घेतली त्या प्रसंगी शहर समन्वयक गिरीश धुमाळ, उपशहर प्रमुख सुर्यकांत म्हसकर, उपतालुका संघटक सौ टिया अरोरा धुमाळ, विभाग प्रमुख आकाश शेलार, उपविभाग प्रमुख दीपक कोडवते, मेघनाथ भोईर, अंकुर पाटील,उपशाखा प्रमुख विकास पेटकर, विभाग संघटक नरेश उलवेकर, सुमित सूर्यवंशी व प्रशांत वाडकर, बबन वाघ ज्येष्ठ शिवसैनिक टेंभोडे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते. सदर फवारणीसाठी पनवेल महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी अमित जाधव व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केल्याने शिवसेनेने त्यांचे आभार मानले आहेत.

# अशोकदादांची स्वप्नपूर्ती, विधी महाविद्यालयाच्या उदघाटनाची जोरदार तयारी

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवेसकर**

**उतेखोल/माणगाव** : माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे जुने माणगांव येथील जिल्हा न्यायालयाचे शेजारी बांधण्यात आलेल्या अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयाच्या देखण्या नूतन इमारतीचे उदघाटन शुक्रवार दि. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी ०३.०० वाजता



महाराष्ट्र राज्याचे नगरविकास व सार्वजनिक बांधकाम मंत्री नाम. एकनाथ शिंदे तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री नाम. उदय सामंत यांच्या शुभहस्ते करण्यात येणार असून शिवसेनेचे दिग्गज नेते माणगांवात येणार असल्याने या भगवेमय सोहळ्याची जोरदार तयारी सध्या सुरु आहे.

अशोकदादा साबळे स्मृतीप्रतिष्ठान व माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सदस्य तसेच माणगांवकर व्यापारी मित्र परिवारातील दादांवर प्रेम करणारी सर्व मंडळी यांच्या दृष्टीकोनातून हा अत्यंत महत्वाचा सोहळा असून माणगांवच्या वैभवात व लौकीकात भर टाकणारी ही ऐतिहासीक घटना ठरणार आहे. तसेच तालुक्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य उज्वल होणार असुन, हे एक अत्यंत महत्वाचे शैक्षणिक दालन विद्यार्थ्यांसाठी खुले होणार आहे. रायगड जिल्यातील अनेक विद्यार्थ्यांना कायदे-विषयक ज्ञान संपादीत करण्याची संधी या विधी महाविद्यालयाद्वारे परिपूर्ण होणार आहे.

यापुढे कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी होणारा मोठा खर्च पाहता जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील विद्यार्थ्यांना ते परवडणारे नाही. याच दृष्टीकोनातून अशोकदादा विधी महाविद्यालय माणगांव येथे झाल्याने ते आणखी लाभदायक ठरणार आहे. स्वतःला जनतेच्या विद्यापीठातील पदवीधर म्हणविणारे लोकनेते अशोक साबळे यांनी एक स्वप्न पाहीले होते व आपल्या आयुष्यात ते सतत शिक्षणासाठी आग्रही भुमिका घेत असत. त्याचाच पाठपूरावा करुन त्यांचेच सूपुत्र शिवसेना नेते डव्होकेट राजीव साबळे यांनी अनंत अडचणीवर मात करीत या महाविद्यालयाची ही देखणी वास्तु अल्प कालावधीतच माणगांव मध्ये उभी केली आहे. दादांच्या स्वप्नपूर्तीचा हा सोहळा डोळे भरुन पाहण्यासाठी तमाम माणगांवकरांना उत्सुकता लागुन राहीली आहे.

यासाठी सर्वांनी महाविद्यालयाचे या कार्यक्रमास हजेरी लावायची आहे. असा निर्धारच जणुकाही सर्व अशोकदादा प्रेमी माणगांवकर मित्र-मंडळीनी केला आहे. या कार्यक्रमास महाड-पोलादपूरचे आमदार भरत गोगावले, अलिबाग-मुरुड-रोहा चे आमदार महेंद्र दळवी, मागाठणे चे आमदार प्रकाश सुर्वे, कर्जत-खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. अशी माहीती संस्थेच्या वतिने देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्याचे दृष्टीकोनातून मैलाचा दगड ठरणाऱ्या या वास्तुचे शुभारंभास सर्वांनी आवर्जुन उपस्थित राहुन शुभाशिर्वाद द्यावेत असे आवाहन शिक्षण संस्थेचे प्रमुख ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा गांधी, चेअरमन ड. विनोद घायाळ, राजन मेथा, नितीन बामगुडे, सुभाष मेथा, नरेंद्र गायकवाड, ज्योती बुटाला यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रासळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी नरेश खाडे बिनविरोध

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



सुधागड तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या सधन व राजकीयदृष्ट्या महत्त्व-पूर्ण ठरलेल्या रासळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी ज्येष्ठ सदस्य नरेश खाडे यांची शेकाप नेते सुरेशशेठ खैरे यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध निवड करण्यात आली. विद्यमान उपसरपंच शिरीष मांढरे यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर नरेश खाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

तरुण तडफदार व कार्यकुशल नेतृत्व असलेले नरेश खाडे गेली दहा वर्षे अत्यंत संघर्षमय वातावरणातून या ग्रामपंचायतीचे नेतृत्व करीत आहेत. प्रचंड विरोध असतानाही त्यांनी ग्रामपंचायतीला विकास कामाच्या माध्यमातून अव्व-लस्थानी आणली आहे. त्यांचे नेतृत्व सर्वमान्य झाले असून नवी वाटचाल करण्यासाठी ते सज्ञ झाले आहेत. रासळ ग्रामपंचायतीमध्ये त्यांनी केलेली विकास कामे ही नजरेत भरणारी असून त्यांच्या कार्यपद्धतीचे ग्रामस्थांकडूनच नव्हे तर संपूर्ण सुधागड तालुक्यातून कौतुक होत आहे. ग्रामपंचायतीचा विकास करण्यासाठी नरेश खाडे यांनी जिल्हा परिषदेकडून कर्ज घेतले. कर्ज घेण्याच्या प्रक्रियेला रासळ ग्रामपंचायतीच्या काही लोकांकडून प्रचंड विरोध झाला असतानाही नरेश खाडे न डगमगता ठामपणे विकास कामे करीत राहिले. त्यांच्या कणखर व खंबीर नेतृत्वामुळे विरोधकही त्यांचे चाहते झाले असून नरेश खाडे यांच्यासोबत येऊ लागले आहेत. नरेश खाडे यांनी रासळ ग्रामपंचायतीचा चेहरा-मोहरा बदलून टाकला असून आदर्श ग्रामपंचायत म्हणून त्यांनी सन्मान मिळविला आहे.

नरेश खाडे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली असून शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा रायगड जिल्हा परिषद सदस्य सुरेशशेठ खैरे, पुरोगामी युवक संघटनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष आरीफभाई मणियार, शेतकरी कामगार पक्ष पाली शहर सहचिटणीस संजोग शेठ, परागशेठ मेहता, सुधीर साखरले यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# टेम्पोची डंपरला धडक ; १ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव टेम्पोवरील चालकाने एका डंपरला धडक दिल्याने झालेल्या अपघातात टेम्पोचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून टेम्पो चालक जखमी झाल्याची घटना तालुक्यातील कोन सा-वळा रोडवर घडली आहे.

टेम्पो चालक प्रमोदकुमार मलिक गिरी (३०) हा त्याच्या ताब्यातील टेम्पो घेवून भरधाव वेगाने कोन-सावळा रोडवर टेक केअर लॉजिस्टीक समोर कोनकडे येणाऱ्या रस्त्यावरुन जात असताना त्याने एका डंपरला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात टेम्पोचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून तो स्वतः जखमी झाल्याने त्याच्या विरुद्ध पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुरुड-जंजिरा शाखेतर्फे कोजागिरी संध्या मैफील

**दै.रायगड नगरी । कोर्लई**



कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुरुड शाखेतर्फे उषा खोत यांच्या निवासस्थानी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त कोजागिरी संध्या मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते.

कोजागिरी संध्या मैफिलीची सुरुवात कोमसाप दक्षिण रायगड अध्यक्ष संजय गुंजाळ, कार्याध्यक्ष अरुण बागडे, सचिव डॉ. मधुकर वेदपाठक, ज्येष्ठ शास्त्रीय गायक डॉ. रवींद्र नामजोशी, उपाध्यक्षा उषा खोत यांनी दिपप्रज्वलन व गणेश पूजन करून केली.उषा खोत यांच्यातर्फे तुळशीची रोपे देऊन उपस्थित मान्यवर, पदाधिकारी व सदस्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्याध्यक्ष अरुण बागडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यानंतर कथाकथन, काव्यवाचन, काव्यगायन, अभिवाचन, किस्से, गप्पा, गाणी अशा मुक्त मैफिलीला सुरुवात झाली.

सदर मैफिलीची सुरेल सुरुवात ज्येष्ठ शास्त्रीय गायक डॉ.रवींद्र नामजोशी यांनी ईशस्तवनाने केली. यानंतर संजयजी गुंजाळ, प्रतिभा जोशी, नैनीता कर्णिक, डॉ. मधुकर वेदपाठक, नगरसेवक पांडुरंग आरेकर सर, उर्मिला नामजोशी, वासंती उमरोटकर, प्रतिभा मोहिले, वैशाली कासार, अरुण बागडे, आशिष पाटील, योगेश दवटे, धार्मी लखमदे, प्रशासनाधिकारी दिपाली दिवेकर मॅडम, नयन कर्णिक साहेब, सिद्धेश लखमदे, उषा खोत यांनी अभिवाचन, काव्यगायन, काव्यवाचन,किस्से, गप्पा, गाणी सादर करून मैफिल रंगविली. सदर मैफिली दरम्यान मुरुडमधील प्रसिद्ध रांगोळीकार, चित्रकार महेंद्र पाटील सर यांनी व्यासपीठावरील कलाकारांचे रेखाटलेले चित्र संध्या मैफीचे आकर्षण ठरले ! सायली गुंजाळ, प्रतीक कातारे, सुधीर खोत, सचिन सुभेदार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन उर्मिला नामजोशी यांनी तर नैनीता कर्णिक आभार मानले.

## जाहीर नोटीस तथा आवाहन

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, माझे अशील १) श्री. तुलशीराम मारुती पाटील, रा. वडघर, ता. पनवेल, जि. रायगड २) श्रीमती सावित्री महादेव पाटील, रा. रुम नं-११, मिलन को. ऑप. हौ. सो., बी विंग, पालवे हॉस्पीटल जवळ, उरण, ता. उरण, जि. रायगड हे आणि गंगाबाई गजानन पाटील, कलावती श्रावण कडू, यमुनाबाई बबन दमडे, बामुबाई पदु पाटील यांचे सामाईक मालकीहक्कातील व ताबेकब्जातील, एकत्र कुटुंबाची, वडीलोपार्जित, अविभाजीत शेतजमीन मिळकत आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे माणघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील**

| सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|
| ९९/० | ०.३८.४० | ७.५६ |

उपरोक्त वर्णन केलेले जमीन मिळकतीमध्ये माझे अशील यांचा १/३ इतका अविभक्त हक्क, हिस्सा व हितसंबंध आहे. माझे अशील यांचे अपरोक्ष गंगाबाई गजानन पाटील, कलावती श्रावण कडू, यमुनाबाई बबन दमडे, बामुबाई पदु पाटील हे उपरोक्त वर्णन केलेली जमीन मिळकत त्रयस्थ व्यक्तींना हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नात आहेत असे माझे अशील यांचे निदर्शनास आले आहे.

तरी, तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे आवाहन करण्यात येत आहे की, माझे अशील यांचे अपरोक्ष गंगाबाई गजानन पाटील, कलावती श्रावण कडू, यमुनाबाई बबन दमडे, बामुबाई पदु पाटील यांचेसोबत उपरोक्त वर्णन केलेले जमीन मिळकतीसंबंधी अथवा तिच्या कोणत्याही हिश्यासंबंधी हस्तांतरणाचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास अथवा रक्कम अदा केल्यास सदरहु हस्तांतरणाचा व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : ओवळे, ता. पनवेल
दिनांक: २२/१०/२०२१

**सही/-**
**ॲड. जितेंद्र परशुराम म्हात्रे**
**वकील,उच्च न्यायालय**
**मु. ओवळे, पो. पारगाव,**
**ता. पनवेल, जि.रायगड, ४१०२०६**

## जाहीर नोटीस तथा आवाहन

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, माझे अशील १) श्री. तुलशीराम मारुती पाटील, रा. वडघर, ता. पनवेल, जि. रायगड २) श्रीमती सावित्री महादेव पाटील, रा. रुम नं-११, मिलन को. ऑप. हौ. सो., बी विंग, पालवे हॉस्पीटल जवळ, उरण, ता. उरण, जि. रायगड हे आणि गंगाबाई गजानन पाटील, कलावती श्रावण कडू, यमुनाबाई बबन दमडे, बामुबाई पदु पाटील यांचे सामाईक मालकीहक्कातील व ताबेकब्जातील, एकत्र कुटुंबाची, वडीलोपार्जित, अविभाजीत शेतजमीन मिळकत आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे मोसारे, ता. पनवेल, जि. रायगड येथील**

| सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|
| ९६/४ | ०.३१.४० | ७.३१ |

उपरोक्त वर्णन केलेले जमीन मिळकतीमध्ये माझे अशील यांचा १/३ इतका अविभक्त हक्क, हिस्सा व हितसंबंध आहे. माझे अशील यांचे अपरोक्ष गंगाबाई गजानन पाटील, कलावती श्रावण कडू, यमुनाबाई बबन दमडे, बामुबाई पदु पाटील हे उपरोक्त वर्णन केलेली जमीन मिळकत त्रयस्थ व्यक्तींना हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नात आहेत असे माझे अशील यांचे निदर्शनास आले आहे.

तरी, तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे आवाहन करण्यात येत आहे की, माझे अशील यांचे अपरोक्ष गंगाबाई गजानन पाटील, कलावती श्रावण कडू, यमुनाबाई बबन दमडे, बामुबाई पदु पाटील यांचेसोबत उपरोक्त वर्णन केलेले जमीन मिळकतीसंबंधी अथवा तिच्या कोणत्याही हिश्यासंबंधी हस्तांतरणाचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास अथवा रक्कम अदा केल्यास सदरहु हस्तांतरणाचा व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : ओवळे, ता. पनवेल
दिनांक: २२/१०/२०२१

**सही/-**
**ॲड. जितेंद्र परशुराम म्हात्रे**
**वकील,उच्च न्यायालय**
**मु. ओवळे, पो. पारगाव,**
**ता. पनवेल, जि.रायगड, ४१०२०६**

मा.इंदलकर साहेब
अर्जदारातर्फे वकील ॲड.अर्चना आ.म्हसकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.१०२६/२०२१
ने.ता.२६/११/२०२१

श्री.सदाशिव काथोर म्हात्रे
उ.व.५८, धंदा : नोकरी
रा.वलप, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक, ग्रामपंचायत वलप,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे आजोबा कै.खंडू उर्फ खंड्या उंदऱ्या म्हात्रे यांचा मृत्यू दि.२४/०६/१९४२ रोजी मौजे मु.वलप, पो.पडघे, ता.पनवेल येथे अर्जदार यांच्या राहत्या घरी झाला असून त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत वलप यांच्या कार्यालयात करण्यात आलेली नाही. त्याकारणाने अर्जदार यांनी मे.न्यायालयात क्रिमिनल चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. तसेच कै.खंडू उर्फ खंड्या उंदऱ्या म्हात्रे यांच्या मृत्यूचा दाखला देण्याबाबत ज्या कुणाच्या हरकती असतील त्या हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत सदर न्यायालयात लेखी कळवाव्यात. तसे न केल्यास सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२१/१०/२०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल**

मा.गोडसे मॅडम कोर्ट
ॲड.रजनी गोवारी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४४०/२०२१
नि.नं.८
ने.ता.७/१२/२०२१

चंदा शाह — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदारचा मुलगा मयत रोहित शाह ह्यांचे निधन दि.१४/१२/२०२० रोजी सिपीआर हॉस्पिटल कोल्हापूर येथे झाले आहे.

मृत्यूसमयी मयत रोहित शाह यांच्या नावावर खालील मिळकत होती तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

| मालमत्तेची किंमत | मालमत्तेचा तपशिल |
|---|---|
| | फ्लॅट नं.६०५ प्रभु द्रिष्टी प्लॉट नं.३, सेक्टर १३, खारघर, नवी मुंबई-४१०२१०, तालुका : पनवेल, जि.रायगड |

वरील प्रमाणे अर्जदार हीच मयत रोहित शाह यांचे कायदेशीर वारसदार आहेत व इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते.

त्यासाठी प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने अशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२१/१०/२०२१
ठिकाण : पनवेल

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड**

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.२२५/२०२१

१) श्रीम.जिजाबाई शिवराम फडके
रा.बोनशेत, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीम.सुनिता बाळाराम भालेकर
उर्फ सुनिता उर्फ जगुबाई शिवराम फडके
३) श्रीम.मंदा शिवराम फडके उर्फ मंदा गोटीराम भालेकर
अ..क्र.२ व ३ रा.चेरवली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीम.लिला शिवराम फडके उर्फ लिला सुरेश म्हात्रे
रा.चिपळे, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीम.पुनम रघुनाथ घरत उर्फ पुनम भगवान म्हात्रे
६) श्री.नरेश भगवान म्हात्रे
७) श्रीम.हर्षदा भगवान म्हात्रे
अ.क्र.५ ते ७ रा.कोन, ता.पनवेल, जि.रायगड — अपिलार्थी
विरुद्ध
१) श्री.वासुदेव दत्तु भालेकर
रा.बोनशेत, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.गणा फुगा उर्फ आंबो फडके
रा.बोनशेत, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
३) बुधाजी शंकर फडके मयत तर्फे वारस
३/१) श्रीम.बेबी रघुनाथ पाटील
रा.बेलवली, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड
३/२) श्रीम.सुनिता प्रकाश ठाकूर
रा.खारपाडा दुश्मी, पो.जिते, ता.पेण, जि.रायगड
३/३) श्रीम.मंजुळा रुपेश गावंड
रा.दूरशेत, पो.जिते, ता.पेण, जि.रायगड
३/४) श्री.संतोष बुधाजी फडके
३/५) श्री.मच्छिंद्र बुधाजी फडके
३/६) श्री.विजय बुधाजी फडके
अ.क्र.३/४ ते ३/६ रा.बोनशेत, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
३/७) श्रीम.वैशाली हनुमंत दळवी
रा.वडगांव, पो.वाशिवली, ता.खालापूर, जि.रायगड
३/८) इंदूबाई दिनेश वाघ मयत तर्फे वारस
३/८/१) श्रीम.दिपाली सचिन चौधरी
रा.दुंदरेपाडा, पो.मोरबे, ता.पनवेल, जि.रायगड
३/८/२) श्रीम.मोनाली दिनेश वाघ
रा.बोनशेत, ता.पनवेल, जि.रायगड
४) गोमा शंकर फडके मयत तर्फे वारस
४/१) श्री.पांडुरंग गोमा फडके
४/२) श्री.जयदास गोमा फडके
अ.क्र.४/१ व ४/२ रा.बोनशेत, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
४/३) श्रीम.ताई कान्हा पाटील उर्फ ताई गोमा फडके
रा.बेलवली, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड
४/४) श्रीम.रुपाली बाळकृष्ण भोपी उर्फ रुपाली गोमा फडके
रा.हरिग्राम, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड
४/५) श्रीम.वनिता दिलीप दवणे उर्फ वनिता गोमा फडके
रा.पिसार्वे, पो.तळोजे, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्री.उमा शंकर फडके उर्फ उमाबाई बामा खुटले
रा.वाकडी, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्रीम.निरा दत्तू भालेकर उर्फ निराबाई रामदास मढवी
रा.उमरोली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
७) श्री.मोहन दत्तू भालेकर
८) श्री.बाळाराम भाऊ भालेकर
अ.क्र.७ व ८ रा.चेरवली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
९) श्रीम.बारकूबाई धाऊ भालेकर उर्फ लक्ष्मी दत्तात्रेय गायकर
रा.नेरे, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
१०) श्री.भगवान तुकाराम मढवी
रा.उमरोली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
११) श्रीम.गुलाब तुकाराम मढवी उर्फ गुलाब जोमा शेळके
रा.चिंचवली, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड
१२) श्रीम.प्रतिमा उर्फ अक्षरा अनंता घरत उर्फ प्रतिमा भगवान म्हात्रे
रा.कोन, ता.पनवेल, जि.रायगड — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे : विहिघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं.७/० क्षेत्र ०-२९-०० आकार ३.५० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि.२७/०८/२०२१ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होवू शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.०३/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १८/१०/२०२१

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी करिता**

# संक्षिप्त...

## मोटर सायकल चोरट्याला पोलिसांनी केली अटक



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा शहरातील नवेनगर परिसरांतील प्रा.आ.केंद्र परिसरां तून प्रदीप तानाजी काळोखे यांची काळ्या- निळ्या रंगाची हिरो होंडा स्पेंडर मोटर सायकल क्रं. MHO6-D 9614 दिं१५.१०.२१ रोजी चोरीला गेली. म्हसळयाचे आभ्यासू स.पो.नी.उध्दव सुर्वे यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा संतोष चव्हाण यानी तपासाची दिशा सीसीटीव्ही फूटेजचा अभ्यास करून नक्की केली आणि केवळ दोन दिवसात चोरीतील मोटरसायकल हस्तगत केली व सराईत चोरट्याच्या मुसक्या आवळल्या चव्हाण यानी आरोपीला पोलीस खाक्या न दाखवता वेगळ्याच तंत्राने जवळीक केली असता त्यानी महाड, पुणे येथून चोरून आणलेल्या अन्य तीन चोरलेल्या मोटर सायकलची माहीती चव्हाणना दिली. तात्काळ म्हसळा पोलीसानी दोन स्पेंडर क्रं MHO6GN.5319, MH12 BY6615, व एक हिरो होंडा पॅशन , MHO6-U2065 अशा रु४२ हजार किमतीच्या चार मोटर सायकल व म्हसळा शहरानजीकच्या सुरई गावाचा २७ वर्षीय अट्टल चोरटा ताब्यात घेतला आहे.

तपासी अमलदार संतोष चव्हाण याना पो. ना. जाधव, पोशी हंबीर, पो.शी खाडे, चापोशी फोपसे यानी उत्कृष्ट साथ दिली हजरजबाबीपणे म्हसळा पोलीसानी केलेल्या तपासाचे तालुक्यात कौतुक होत असून व अन्य चोऱ्यांचा तपास लवकरच लागेल याकडे तालुक्यातील जनता लक्ष ठेऊन आहे.

## राहत्या रुममधून मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या रुमचा दरवाजा उघडा असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने त्या घरातील दोन मोबाईल चोरुन नेल्याची घटना खैरणे गाव येथे घडली आहे.

या ठिकाणी राहणारे भगवानदिन भोलेनाथ वर्मा (४२) यांच्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी २५ हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल चोरुन तो पसार झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पोलादपूरकरांचे डोळे वाट पाहताहेत नगरपंचायत निवडणुकीची

## महाआघाडी की स्वतंत्र लढतीचे चित्र? राजकीय खलबतं सुरू!

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : तालुक्याच्या ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतीमध्ये करण्याच्या निर्णयानंतर पोलादपूर ग्रामपंचायतीची दोन वर्षांची सत्ता संपुष्टात येऊन नगरपंचायतीमध्ये रूपांतर होऊन निवडणुका जाहिर होईपर्यंत तहसिलदारांनी प्रभारी कार्यभार सांभाळला होता. तशीच परिस्थिती या पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर पाच वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर गेल्या तब्बल ९ महिन्यांपासून महाडच्या प्रांताधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत प्रशासकीय कामकाज सुरू असल्याने आता पोलादपूरकरांचे डोळे नगरपंचायतीच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीची वाट पाहात आहेत.

दरम्यान, राज्यातील महाआघाडी सरकारच्या पार्श्वभूमीवर नगरपंचायतीमध्येही महाआघाडी निवडणूकपूर्व लढणार की सर्व पाच पक्ष स्वतंत्र लढणार याबाबत राजकीय खलबतं सुरू आहेत. मतदार पुनरिक्षण कार्यक्रमासह अंतिम मतदार यादी प्रसिध्दीचा कार्यक्रमही जाहिर झाल्याने आता पुन्हा पोलादपूर शहरातील राजकीय हालचालींना सुरूवात झाली आहे.

२०११ च्या राष्ट्रीय जनगणनेनुसार २०१४ मध्ये पोलादपूर ग्रामपंचायत आणि त्यानंतर झालेल्या पोलादपूर नगरपंचायतीच्या पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम २०१६ मध्ये पार पडला. २४ जानेवारीपासून २४ फ ेब्रुवारीपर्यंतच्या पहिल्या ३० दिवसांसाठी प्रशासकाची मुदत संपुष्टात येऊन पुढील प्रशासकीय कार्यकाळ सुरू झाला. आजमितीस प्रशासक म्हणून महाड उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी काम काज चालविले असून या काळात कोविड-१९ लॉकडाऊन, निसर्ग वादळ तसेच अतिवृष्टीचा फटका पोलादपूर शहरवासियांना बसल्याने मोठ्या प्रमाणात प्रशासकीय कामकाजावरील निरंकूशपणाची अगतिकता सर्व राजकीय पक्षांना जाणवली आहे. २४ जानेवारी २०२१ रोजी पाच वर्षांचा कार्यकाळ संपल्याने नगरपंचायतीचा कार्यभार प्रशासक म्हणून महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी स्विकारल्यानंतरही बरखास्त नगरपंचायतीचे सदस्य व पदाधिकारी शहरातील अंदाजपत्रक आणि आर्थिक मंजूरी नसलेल्या विकासकामांचे नारळ फोडत असल्याचे दृश्य जागोजागी दिसूनही यावर आचारसंहिता नसल्याने अंकूश बसू शकला नाही.

आगामी काळात पोलादपूर नगरपंचायतीच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी १ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत दावे आणि हरकती दाखल करण्यात येतील. यापूर्वी मतदारांची यादी निश्चित करण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीवेळी प्रांताधिकारी तथा पोलादपूर नगरपंचायतीच्या प्रशासक प्रतिमा पुदलवाड यांच्याकडे दाखल केलेल्या दावे आणि हरकतींचा यावेळी समावेश होणार अथवा कसे यासंदर्भात स्पष्टता दिसून येत नसून या दावे आणि हरकती निकाली काढण्यासाठी २० डिसेंबर २०२१ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. यानंतर दि.०५ जानेवारी २०२२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या यापुर्वीच्या मतदार यादीसंदर्भातील दावे व हरकतीच्या बैठकीवेळी पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीवेळी निवडून आलेल्या शिवसेना आणि कॉंग्रेस तसेच निवडून न आलेल्या मनसे आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आक्षेप व हरकतीचे विविध मुद्दे मांडले होते. मात्र, आता लॉकडाऊननंतरच्या काळात नगरपंचायतीतील प्रमुख दोन पक्षांतील जवळीक काही कारणास्तव वाढल्याने आगामी दावे आणि हरकतीच्या बैठकीवेळी प्रमुख पक्षांची भूमिका काय असेल, यावरच महाआघाडीची समीकरणे स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# बेकायदेशीररित्या वाहन पार्कींगमुळे फुटपाथ गिळंकृत

## व्यापाऱ्यांसह स्थानिक रहिवाशांनी संताप व्यक्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**



नवीन पनवेल परिसरात अनेक ठिकाणी बेकायदेशीररित्या तसेच चार चाकी वाहने मन मानेल तशी उभी करण्यात येत असल्याने पादचाऱ्यांसाठी ये-जा करण्यासाठी असलेला फुटपाथ गिळंकृत झाला असून त्यामुळे स्थानिक रहिवाशांसह व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त करून वाहतूक शाखेने कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

नवीन पनवेल परिसरातील रेल्वे स्टेशन समोरील असलेल्या अनेक सोसायटीच्या परिसरात दुकानात व गल्ल्यांमध्ये बेकायदेशीररित्या दुचाकी व चार चाकी वाहने उभी करून गाडी चालक मालक हे आपल्या कामानिमित्त रेल्वेने जातात. अनेक जण तर दुचाकी वाहने फुटपाथवरच उभी करून निघून जातात. त्यामुळे स्थानिक रहिवाशांना व व्यापाऱ्यांना तेथून ये-जा करणे मोठे जिकरीचे बनते. या संदर्भात पनवेल वाहतूक शाखेकडे तक्रार करून सुद्धा टोईंग व्हॅन कारवाई करत नसल्याबद्दल येथील रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे. अनेक वेळा रुग्णांना ने-आण करण्यासाठी रुग्ण वाहिका सुद्धा अशा रस्त्यावरुन जावू शकत नाही. तर अचानक आग लागल्यास अग्नीशमन दलाचे बंब घटनास्थळी कसे पोहोचतात असा सवाल सुद्धा येथील रहिवाशी करीत आहेत. याबाबत वाहन चालकांना विचारले असता हा रस्ता तुमच्या मालकीचा आहे का? असा ते सवाल तेथील लोकांना करतात. त्यामुळे अनेक वेळा हाणामारीची वेळ सुद्धा येते. तरी त्याा वाहनांवर नवीन पनवेल वाहतूक टोईंगने कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

> पार्कींगच्या सुविधा असताना तेथील पैसे वाचविण्यासाठी अनेक जण आपली दुचाकी वाहने फुटपाथवर तसेच गल्ल्यांमध्ये मोठ्या संख्येने उभी करून ठेवत असल्याने सर्वांना अडचणीचे झाले आहे. तरी याबाबत महानगरपालिकेसह वाहतूक शाखेने कारवाई करावी.
>
> **राजेंद्र कोळकर,**
> **स्थानिक रहिवाशी**

# प्रितम म्हात्रे यांचा अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते कोरोना वॉरियर पुरस्काराने सन्मान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मधील सुप्रसिद्ध पू.ना. गाडगीळ ज्वेलर्स यांच्या वतीने जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून कोविड काळात केलेल्या सामाजिक कार्यबद्दल पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते व जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष प्रितम म्हात्रे यांना सुप्रसिध्द मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व पु.ना.गाडगीळ ज्वेलर्सचे सर्वेसर्वा सौरभ गाडगीळ यांच्या हस्ते 'कोरोना वॉरियर पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

जे .एम .म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून कोविड काळात प्रितम म्हात्रे यानी समाजभिमुख काम केले आहे. अनेक गरजूना मदतीचा हात दिलेला आहे. हजारो गरीबाना जेवण, अन्नधान्य, आर्थिक मदत करून पुण्याचे काम केलेले आहे. पूरग्रस्त भागात पाणीपुरवठा, मोठ्या मशीनरी व अन्नधान्याचा पुरवठा करण्यात आला होता. याच भावनेतून प्रितम म्हात्रे यांना सोनाली कुलकर्णी व सौरभ गाडगीळ यांच्या हस्ते कोरोना वॉरियर पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. पुरस्कार समारंभात मंगेश अपराज, रोहन गावंड सह अनेक मान्यवर उपस्थित होते. मिळालेल्या पुरस्कारा बद्दल प्रितम म्हात्रे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# प्लॅस्टिक बंद मोहिमेला 'ब्रेक'

## पेण न.प.प्रशासन अपयशी? तर कोरोनाने दिली प्लॅस्टिकला उभारी

**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

**पेण** : दोन वर्षाहून अधिक काळ प्रभाव दाखविलेल्या कोरोनाने सामाजिक घडी अक्षरशः विस्कळीत केली आहे. अनेकांचे रोजगार गेले, व्यवसाय बुडाला. याउलट विविध प्रकारचे व्यवहार ठप्प झाल्याने ध्वनी, वायू प्रदूषणही कमी झाले, यात वाद नाही. तरीही कोरोना अनेकांच्या जीवावर बेतले. दुसरीकडे लॉकडाऊन शिथिल होताच पृथ्वीच्या आरोग्याला कायम धोका निर्माण करणाऱ्या प्लॅस्टीक बंदी मोहिमेचा पेण नगरपरिषदेसह बहुतांश सर्वच विभागातील प्रशासनाला विसर पडला. हेच सध्या प्लॅस्टिक वापराच्या नव्या मानसिकतेतून दिसून येत आहे. त्यात पेण तालुक्यातील ग्रामीण भागाची मुख्य बाजारपेठ असणाऱ्या पेण शहरातील बहुतेक दुकानदार, हातगाडी, मच्छी, मटण, फळे विक्रेते बिनधास्तपणे ग्राहकांना प्लॅस्टीक पिशव्या देत आहेत, त्यामुळे प्लॅस्टीक बंदी मोहिमेला ब्रेक लागण्याचे सर्वश्रुत आहे. प्रारंभी काळात प्रभावी ठरलेली प्लॅस्टीक बंदी मोहिमेला सैलपणा आले. मुख्यतः पेण शहरात प्लॅस्टीकचा सर्रास वापर होत असल्याने पेण नगरपरिषद प्रशासन कमालीचे अपयशी ठरल्याचे समोर येत आहे. दरम्यान, पेण शहरासह तालुक्यातील सर्वच भागात प्लॅस्टीकने जोरदर डोके वर काढले आहे. प्लॅस्टीक वापर रोखण्यात जिल्हा प्रशासन, पंचायत समिती प्रशासन, ग्रामपंचायत प्रशासनही पूर्णत: अपयशी ठरले आहे. अशात संपूर्ण जगावर आलेल्या महा भयंकर संकट कोरोनाने प्लॅस्टीकला उभारी दिली की काय ? असेच चित्र सध्या पेणमध्ये पाहायला मिळत आहे.

कोरोनाचे जाचक निर्बंध सध्या शिथिल झाल्याने या काळात प्लॅस्टीक बंदी मोहिमेला मोठी खीळ बसली. सर्व प्रकारचा प्लॅस्टीक किती धोकादायक आहे, हे नुकत्याच आलेल्या विविध नैसर्गिक आपत्तीने वारंवार दाखवून दिले. अनेक नाले, ओढे प्लॅस्टीकच्या साठ्यांनी चक्काजाम झाले. त्यातून पाण्याने मार्ग बदलत आपली अधिक ताकद दाखवून दिली. प्लॅस्टीक कचऱ्याने जमीन नापीक होत आहे. आज सर्वच रस्त्याच्या दुतर्फा, कालवा, गटारे, मैदाने प्लॅस्टीक आणि दारूच्या बाटल्यांनी अक्षरश: विद्रुप झालेत. ठीकठिकाणी प्लॅस्टीकच्या पिशव्यांनी पाणी अडले आहे. अनेक ठिकाणी कचऱ्यातून दुर्गंधी येत आहे. मच्छर वाढली आहे. महाड व इतर ठिकाणच्या महापुरात निसर्गाचे 'टिट फॉर टिट' रुप पहायला मिळाले. फेकलेल्या प्लॅस्टीकच्या बाटल्या पुन्हा त्याच जागी आल्या, प्लॅस्टीकचा धोका रोखण्यासाठी शासनाने त्यावेळी जोरदार प्लॅस्टीक मुक्त मोहीम सुरू केली, मोहिम अंशतः यशस्वी ठरली खरी मात्र कोरोना काळापासून आजपर्यंत मोहिमेत पुन्हा खंड पडले आहे. अशात सध्याच्या काळात प्लॅस्टीकचा वापर खूपच वाढला आहे. मुख्य



बाजारपेठ पेण शहरात प्लॅस्टीक बंदी मोहिमेला हरताळ फासले गेले. आधीच रस्त्यावर पडलेले खड्डे, विविध अर्धवट विकास कामे, भुयारी गटार योजना कामात तुफान चर्चेत आलेल्या पेण न.प. प्रशासन प्लॅस्टीक मोहीम नव्याने राबविण्यात फेल ठरली. आता नगरपरिषदेला पूर्णवेळ जीवन पाटील हे मुख्याधिकारी भेटले. त्यामुळे मुख्यत: प्लॅस्टीक बंदी मोहीम अधिक क्षमतेने सुरू होईल, असे वाटत होते, मात्र प्लॅस्टीक बंदी मोहीम अद्याप प्रभावी न ठरल्याने प्लॅस्टीक मोहिमेला ब्रेक दिले की काय ? असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान नवे मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कारवाई करण्याचा सूचना दिल्या असल्याचे सांगितले. यापुढे आपण शहर प्लॅस्टीक मुक्त मोहीम अधिक प्रभावी करणार आहोत. याअगोदर अनेकदा कारवाई केली. अजूनही प्लॅस्टीक विक्री व वापर सुरू आहे, त्यावरही कारवाई सुरू करू असे पाटील यांनी सांगितले. नवे मुख्याधिकारी जीवन पाटील हे पेणकरांना सर्वंकष न्याय देतील ? अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे.

# हुतात्म्यांच्या स्मरणार्थ स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा निमित्त काव्यमैफिल संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दिनांक २० ऑक्टोबर रोजी हुतात्मा हिराजी पाटील ज्यु.कॉलेज कडाव येथे वीर हुतात्मा भाई कोतवाल आणि वीर हुतात्मा हिराजी पाटील यांच्या स्मरणार्थ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त विद्यार्थी ,शिक्षकांसाठी काव्य मैफली कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



प्राचार्य मनीषा बैकर यांनी मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. माथेरानचे भूमिपुत्र रायगड भूषण नारायण सोनवणे यांनी वीर हुतात्मा हिराजी पाटील यांची कविता सादर करून विद्यार्थी, शिक्षकांना मार्गदर्शन केले आणि दोन्ही हुतात्म्यांच्या स्मरणार्थ ग्रामस्थांच्या सहकार्याने सुरू केलेल्या क्रांतिज्योती मध्ये सक्रिय होण्यास सर्वांना आवाहन केले. कोकण मराठी साहित्य परिषद कर्जतचे अध्यक्ष शेळके यांनी कवीचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना माहिती दिली.

काव्यातून सर्वांना प्रेरणा दिली. वाडीले सर, महेश बार्शी आणि जागतिक कीर्तीचे आदर्श शिक्षक मारुती बागडे सर यांनी काव्यातून आदिवासी क्रांतिवीर यांची माहिती दिली. कार्यक्रमात रायगड भूषण नारायण सोनवणे यांचा सत्कार ज्येष्ठ साहित्यिक रायगड भूषण प्रा.एल बी पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. कार्यक्रमासाठी वंजारवाडी शाळेचे आदर्श शिक्षक श्री नरेंद्र साळुंके हे आवर्जून उपस्थित होते. पौर्णिमा सोनवणे, योगिता जाधव, वैशाली ठोंबरे, मंदार मुरकुटे, सौरभ तेलवणे, सायली माडीक, शाम शेळके,यश मराडे इ.शिक्षक वृंद सक्रिय सहभागी होते.

# खारघरमध्ये भटक्या कुत्र्यांसाठी फिडींग केंद्र

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पर्यावरण-प्राणी प्रेमी ज्योती नाडकर्णी आणि खारघर तळोजा कॉलनी वेल्फेअर असोसिएशन यांच्या सहयोगाने खारघर, सेक्टर- ३५ येथे प्रायोगिक तत्वावर भटक्या वुत्र्यांसाठी फिडींग स्टेशन सुरु करण्यात येणार आहे. या ठिकाणी वुत्र्यांचे लसीकरण आणि मोफत रक्त तपासणी केली जाणार आहे.

खारघर, सेक्टर-३४,३५ परिसरात मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्यांचा वावर आहे. रस्त्यावर भटकी कुत्रे ठाण मांडून राहत असल्याने पालक आणि लहान मुलांमध्ये भितीचे वातावरण आहे. भटक्या वुत्र्यांना निवांत वसाहती लगत एका शेडमध्ये उन्हाळा-पावसाळ्यात निवांत बसता यासाठी फिडींग स्टेशन उभारण्यात आले आहे. यासंदर्भात पनवेल महापालिका आणि सिडको प्रशासनाकडे रितसर अर्ज देण्यात आले आहे. फिडींग स्टेशनसाठी खारघर, सेक्टर-३५ जी हाईड पार्क जवळ जागा आहे. सदर ठिकाणी भटक्या वुत्र्यांसाठी सोयीची जागा आहे. भटकी कुत्रे स्वच्छ आणि निरोगी असावेत यासाठी त्यांना महिन्यातून दोन वेळा पशुवैद्यकीय डॉक्टर भेट देऊन तपासणी करणार आहेत. तसेच वुत्र्यांसाठी मोफत रक्त तपासणीही केली जाणार आहे, अशी माहिती ज्योती नाडकर्णी यांनी दिली. दरम्यान, सदर प्रकल्प प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यांसाठी असणार आहे. प्रतिसाद मिळाल्यास पुढील निर्णय घेण्यात येईल. अधिक माहितीसाठी ९६१९९८९७३० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन ज्योती नाडकर्णी यांनी केले आहे.

# आ.बाळाराम पाटील यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य वाटप



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

कोकण शिक्षक मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळाराम पाटील यांच्या वैयक्तिक स्थानिक आमदार निधीतून शाळापयोगी शैक्षणिक साहित्याचे वाटप रोहा येथील कोएसो मेहेंदळे हायस्कूल मध्ये तालुक्यातील विविध माध्यमिक शाळांना करण्यात आले.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते व रोहा तालुका शाळा निरीक्षक, आमदार बाळाराम पाटील यांचे विश्वासू, पनवेल तालुका कृषी उत्पन्न समितीचे माजी सभापती, संचालक मोहन कडू उपस्थितीत सदर साहित्याचे वाटप त्यांच्याच हस्ते करण्यात आले. याप्रसंगी हे साहित्य वाटप करण्यासाठी शेकाप नेते मोहन कडू,मेहेंदळे हायस्कूल प्राचार्य रमेश मोसे, शेकाप नेते प्रकाश नाईक, विरजोली हायस्कूल मुख्याध्यापक विनय मार्गे, चिल्हे हायस्कूल मुख्याध्यापक दिपक जगताप,नारायण पानसरे, पर्यवेक्षक टि.एल.म्हात्रे, किशोर पाटील, गणेश लांगी, सुनिल थिटे,विशाल सोनकर,अमोल पाटील इत्यादी शिक्षक वर्ग उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना संचालक मोहन कडू यांनी आमदार बाळाराम पाटील यांनी आतापर्यंत स्थानिक विकास निधी अंतर्गत कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शालापयोगी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले आहे, त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील एकूण १५५ शाळांमध्ये कम्प्युटर्स त्याचबरोबर एकूण ३२० शाळांमध्ये प्रयोगशाळा साहित्याचे वाटप केले आहे .सन २०२१ वर्षातील निधीतून रोहा येथील मेहेंदळे हायस्कूल येथे तालुक्यातील विविध माध्यमिक शाळांना वाटप करण्यात आलेल्या साहित्यामध्ये ब्लॅकबोर्ड इन्स्ट्रुमेशन,भूमितीसंच,चार्ट, ई-चार्ट इत्यादी प्रकारचे साहित्य वाटप करण्यात आले.